# उत्तर बाल्यावस्थेतील बालकांवर मूल्य शिक्षणाचा परिणाम

**प्रा. डॉ. पुनम देशमुख** इंदिराबाई मेघे महीला महाविद्यालय, अमरावती

बालकामध्ये सद्‌गुण निर्माण करण्याची क्षमता व जबाबदारी ही प्रामुख्याने त्यांच्या आईची असते. त्याचप्रमाणे कुटुंबातील वडीलधा–यांची अर्थातच संस्कार करण्याकरीता मुळात सद्‌गुण आई, वडीलधारी व्यक्तींमध्ये असणे गरजेचे असते. त्यांच्या वागणुकीतून हे संस्कार बालकाच्या मनावर रुजतात.

स्वामी विवेकानंद म्हणतात, "कोणत्याही क्षेत्रातील कोणताही संस्कार हा मनावर दवबिंदूप्रमाणे व्हावा. दवबिंदू हे ज्याप्रमाणे हळवारपणे, नकळत पिकांचे, वृक्षाचे पोषण करतात व विरुन जातात त्याचप्रमाणे मानवी मनावर देखील सहज, नकळत त्याला पोषक अशा तत्वविचारांचा, धर्मविचारांचा, नितीविचारांचा, संस्कार होऊन संस्काराची संपूर्ण प्रक्रिया विरुन जाण्यानेच संस्कारीत मने तयार होतील."

21 व्या शतकात एकीकडे विज्ञानाची प्रगती होत आहे. तर दुसरीकडे माणसात सुसंस्कृतपणा , नैतिकता, एकात्मता, धार्मिकता व राष्ट्रीय भावना इ. गुणांचा, मानवी मुल्यांचा ऱ्हास होत असल्याचे आढळून येते. समाजामध्ये दृष्टप्रवृत्ती वाढीस लागल्या असून त्या चांगल्या व निकोप समाज निर्मितीला घातक ठरत आहे. त्यामुळे मानसी जीवन अनैतिकतेच्या मार्गाने भरकटत चालत आहे.

मूल्य या संकल्पनेचा अर्थ कठील असला तरी आपण रोजच्या व्यवहारात त्याचा वापर नेहमीच करीत असतो. आपल्या दैनंदिन जीवनात भावना, उद्दिष्टे, परिस्थिती यांना महत्व देण्याच्या दृष्टीने त्यांचे निरिक्षण मूल्याद्वारे करण्यात येते.

स्त्रीला बालकाचे संगोपन व संवर्धन करणे, त्यांच्यावर सुसंस्कार करणे, त्यांना व्यक्तिमत्वाचे धडे देणे, समाजात प्रतिष्ठितपणे जगण्याकरीता ज्ञान देणे, त्याला सुदृढ व सक्षम बनविणे ही कर्तव्ये पार पाडावी लागतात. या कार्यात सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने बालकांना मूल्यशिक्षणाची गरज आहे.

- संशोधनाची उद्दिष्टे
- मूल्यशिक्षणाचे महत्व जाणून घेणे.
- उत्तरबाल्यावस्थेतील बालकांवर मूल्यशिक्षणाचा होणारा परिणाम अभ्यासणे.

- **वाड्रूमयावलोकन –**

"मिस्त्री (1982) यांच्या मते ৮ सांस्कृतिक परंपरा आणि मूल्ये, मूल्यांची निर्मिती व समाजाची ध्येये यात परस्पर संबंध अपेक्षित आहे. समाजातील आर्थिक, राजकिय, धार्मिक ध्येयांचा शैक्षणिक निर्धारणावर परिणाम होत असतो. त्यामुळे नागरिक मूल्यांचा शिक्षणामध्ये समावेश करावयास हवा व विद्यार्थ्यांमध्ये ती रुजवावयास हवी असे सांगून मानवामध्ये सामाजिकता, लोकशाही, स्वातंर्त्य, समानता इ. नागरी मूल्यांवर विशेष भर दिला असून शिक्षणाने ही मूल्ये दुर्लक्षित केली असल्याचे म्हटले आहे."

सुर्यवंशी (1993) यांच्या मते, " शारीरिक शास्त्र या विषयातून नियमांचे पालन, स्वच्छता, कर्तव्य, जबाबदारी, सेवाभाववृत्ती, राष्ट्रनिष्ठा इ. मूल्यांची जोपासना करता येते. खेळा हा विद्यार्थी जीवनास आवश्यक असून त्याद्वारे सांघिक भावना, संयम, समायोजन, शिस्त आणि खिलाडूवृत्ती यांची जोपासना केली जाते. त्यामुळे यांचा समावेश अभ्यासक्रमात करावा अशी सुचना केली. "

- **संशोधन पध्दतीची निवड व नमुना निवड –**

प्रस्तुत अध्ययनासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दती वापरण्यात आली. या अध्ययनासाठी अमरावती शहारतील 10 शाळेतील 100 विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

- **तथ्य संकलन –**

" प्रस्तुत अध्ययनासाठी मुलाखत अनुसूची आणि निरिक्षण तंत्राचा वापर करण्यात आला आहे. "

**परिणाम व चर्चा**

मूल्य शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी उत्तर बाल्यावस्थेतील बालकांवर मूल्यशिक्षणाचा परिणाम जाणून घेण्याकरीता प्राप्त माहितीचे विश्लेषण खालील सारणींमध्ये केले आहे.

| अ. क्र. | विवरण | होय (%) | नाही (%) |
|---|---|---|---|
| 1 | तुमच्या कुटूंबातील वातावरण आनंदी असते | 70 (70) | 30 (30) |
| 2 | अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा समावेश असावा असे आपणास वाटते. | 50 (50) | 50 (50) |
| 3 | मूल्यशिक्षणा विषयी तुमच्या पालकांचा दृष्टीकोन अनुकूल आहे काय ? | 60 (60) | 40 (40) |
| 4 | मूल्यशिक्षणासाठी पालकांकडून प्रेरणा प्राप्त होते काय ? | 65 (65) | 35 (35) |
| 5 | शालेय कार्यक्रमात तुमची उपस्थिती असते काय ? | 80 (80) | 20 (20) |
| 6 | तुमच्या दृष्टीकोनातून मूल्यशिक्षण शिकविणा–या शिक्षकांचा मूल्यशिक्षणाविषयी समाधानकारक दृष्टीकोन वाटतो. | 60 (60) | 40 (40) |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | मूल्यशिक्षणामुळे तुमच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अनुकूल परिणाम होईल असे वाटते. | 70 (70) | 30 (30) |
| 8 | मूल्यशिक्षणामुळे वर्तनसमस्या सोडविण्यासाठी मदत होते. | 60 (60) | 40 (40) |
| 9 | प्रत्यक्ष अनुकरणात विविध प्रकारच्या अडचणींना समोरे जावे लागते असे आपणास वाटते काय ? | 50 (50) | 50 (50) |
| 10 | मूल्यशिक्षणामुळे आपणास शिस्त प्राप्त होते काय ? | 80 (80) | 20 (20) |

कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, 70 टक्के कुटूंबातील वातावरण आनंदी असल्याचे दिसते तर 30 टक्के कुटूंबातील वातावरण आनंदी दिसून येत नाही. याचाच अर्थ कुटूंबामध्ये भांडणे, कलहाचे वातावरण दिसून येत नाही. 50 टक्के विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमामध्ये मूल्यशिक्षणाचा समावेश असावा असे आढळून आले. जणे करुन आपला व्यक्तिमत्व विकास होण्यास मूल्यशिक्षण उपयोगी येईल असे वाटते. 60 टक्के पालकांचा मूल्यशिक्षणाविषयी अनुकूल दृष्टिकोन दिसून आला. 65 टक्के विद्यार्थ्याना मूल्यशिक्षणाविषयी पालकांकडून प्रेरणा मिळाल्याचे निदर्शनास आले 80 टक्के बालक शालेय कार्यक्रमास उपस्थिती दर्शविल्याचे आढळून आले. यावरुन शालेय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्टेज डेअरींग, निर्माण होत असल्याचे दिसून आले. 60 टक्के शिक्षकांचा मूल्यशिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन असल्याचे विद्यर्थ्यांच्या निदर्शनास आल्याचे आढळून आले. म्हणून शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना सकारात्मकतेचे धडे मिळतांना दिसले. 70 टक्के विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणामुळे व्यक्तिमत्व विकास अनुकुल होण्यास आढळून आले.

60 टक्के विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणामुळे वर्तनसमस्या सोडविण्यात मदत होतांना निदर्शनास आले.

50 टक्के विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण अनुकरतांना विविध प्रकारच्या अडचणी निर्माण होतांना दिसून आले.

80 टक्के विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षामूळे आम्हास शिस्त प्राप्त होते असे लक्षात आले आहे.

**निष्कर्ष –**

1) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या आचरणात मध्यम स्वरुपाचा बदल झाल्याचे दिसून आले.

2) मूल्यशिक्षण विषयाचे शिक्षण जास्त परिणामकारकरित्या होण्याच्या दृष्टीने पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विचार गांभीर्याने करणे गरजेचे ठरते.

3) विद्यार्थ्यांमध्ये कौटूंबिक मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने मूल्यशिक्षणाचा उपयोग होतो.

**संदर्भ सूची –**

1. मिस्त्री,एस.पी. (1982) भारतीय शिक्षणातील नैतिक मूल्ये अय्यर जर्नल ऑफ एज्युकेशन, व्हॉल्यु –4
2. सुर्यवंशी, आर.बी. (1993), शिक्षणातून सुसंस्कार, मूल्यशिक्षण विशेषांक, शिक्षण भारती.
3. आगलावे प्रदिप (200), संशोधन पध्दती व तंत्रे विद्या प्रकाश, नागपूर